२०१०-२०११

MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग
सत्यमेव जयते
Life • Liberty • Equality • Dignity

# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग



## १० वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०१० -३१ मार्च २०११

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## १० वा वार्षिक अहवाल

## (एप्रिल, २०१०—मार्च, २०११)

वाय २१८७—१

# वर्षिक अहवाल २०१०—११

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... ... ... | तीन |
| १ परिचय ... ... ... ... ... | १ |
| २ तक्रारीचे स्वरूप ... ... ... ... ... | ३ |
| ३ आयोगाची कार्ये ... ... ... ... ... | ७ |
| ४ मानवी हक्क शिक्षण आणि जागृतकता प्रोत्साहन ... ... ... ... | ११ |
| ५ प्रशासकीय काम आणि तर्कसंगतीचे समर्थन ... ... ... ... | १३ |

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग**

**९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई ४०० ००१**

**दूरध्वनी : २२०३ ४२३३ • फॅक्स : २२०९ १८०४**

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा दहावा वार्षिक अहवाल असून तो १ एप्रिल २०१० पासून तर ३१ मार्च २०११ या कालखंडासाठी आहे.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मानवी हक्क संरक्षणासाठी काम करीत आहे. सार्वजनिक प्राधिकरणाकडून मानवाधिकारांच्या विविध प्रकारच्या उल्लंघनासंबंधीच्या तक्रारी निवारण करण्याचे आयोग प्रयत्न करीत आहे. आयोगाची स्थापना ३१ मार्च २००१ रोजी मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ नुसार करण्यात आली. आयोगाकडे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून वैयक्तिकरित्या फॅक्सद्वारे किंवा पोस्टाद्वारे तक्रारी प्राप्त होतात. तेथे वकील नेमणूक करण्याची गरज नाही आणि तक्रारदार आपल्या तक्रारी मराठी, हिंदी किंवा इंग्रजीमध्ये दाखल करू शकतो. तेथे एक अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. त्याच्या हाताखाली अधिकारी काम करीत असतात. आयोग मानवी हक्क जागरुकता आणि शिक्षण हे कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात, कार्यशाळा चर्चासत्रे, परिसंवाद इ. मार्गाने आयोजित करीत असतो. आयोगाने सुरू केलल्या प्रशिक्षण कार्यक्रमामार्फत जनतेमध्ये मानवी हक्क साक्षरता प्रसार होण्यास मदत झाली आहे.

जो पर्यंत मानवी हक्क चळवळ ही उच्च वर्गाच्या नियंत्रणाखाली राहील तो पर्यंत ती चळवळ हे एक दुःखद असत्य राहील. ही चळवळ पंचतारांकित संस्कृतीचे बाहेर यायला हवी. मानवी हक्क चळवळ ही समाजाच्या खालच्या स्तरावर न्यायला हवी. आपणांस सामाजिक बांधीलकी, सामाजिक जबाबदारी, गरिबांचे दुःख समजून घेण्याची जाणीव हवी.

आज रोजी आयोगात कार्यरत असलेले मा.अध्यक्ष आणि सदस्य यांनी सप्टेंबर, २०१३ मध्ये कार्यभार स्वीकारला, आतापर्यंत २००७-२००८ ते २०१२-१३ पर्यंतचे वार्षिक अहवाल तयार करून तत्कालीन सचिव, श्री. मफिउल हूसेन यांनी सरकारकडे सादर केले नव्हते, त्याची कारणे त्यांनाच माहिती असू शकतील. नवीन अध्यक्ष आल्यानंतर पूर्वीच्या वर्षाचे प्रलंबित असलेल्या वार्षिक अहवालाचे कार्य प्राधान्यक्रमाने घेऊन ते सादर करण्यात येत आहेत.

**श्री. भगवंतराव डी. मोरे,**
सदस्य.

**न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नुरमठ,**
अध्यक्ष.

स्थळ : मुंबई,

दिनांक :

# भाग १

## परिचय

(१) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (एमएसएचआरसी) ही एक वैधानिक संस्था असून तिची ६ मार्च २००१ रोजी स्थापना करण्यात आली. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी, अध्यक्ष व तीन सदस्यांची नियुक्ती करण्याचे आदेश मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम २२ अन्वये प्रदान करण्यात आले. सुरवातीपासून नागरिकांचे संरक्षण आणि मानवी हक्क संरक्षण करणे आणि आधार देणे यासाठी आयोग नेहमी प्रयत्नशील राहिले आहे.

(२) " मानवाधिकार " हा एक अधिकार माणसाला जन्मतः प्राप्त आहेत कारण तो एक मनुष्य आहे. मानवी हक्क हे व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठेशी संबंधित असे अधिकार आहेत. यापैकी अनेक अधिकारांच्या हक्कांची हमी राज्यघटनेने दिली असून आयोगाने आणि भारतातील न्यायालयामार्फत ते अंमलात आणले जात आहेत.

(३) मानवी हक्क ही संकल्पना ही मॅग्ना कार्टा इ. स. १२१५ ए.डी, इंग्रजी हक्क बील इ.स. १६८९ आणि मनुष्य व नागरिकांचे अधिकार घोषणापत्राच्या उत्पत्तिमधून साकारली गेली.

(४) परंतु दुसऱ्या जागतिक महायुद्धामध्ये झालेल्या अत्याचार आणि नरसंहार आणि युद्धामुळे झालेले प्रचंड नुकसानीचा राष्ट्रांनी अनुभव घेतला. ज्या सर्वांचा अंतिम परिणाम म्हणून १९४५ साली जागतिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याचा स्वीकार करण्यात आला.

(५) जरी मुलभूत हक्क हे भारताच्या राज्यघटनेने सर्व नागरिकांना हमी देण्याचा एक भाग असला तरी, बऱ्याच काळानंतर मानवी हक्काकरिता स्वतंत्र कायदा पारित करण्यात आला. मानवी हक्क अधिकार, १९९३ च्या कायद्याने राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि राज्य मानव अधिकार आयोग अस्तित्वात आणलेत. हा कायदा ऑक्टोबर, १९९१ मध्ये पॅरिस येथे झालेल्या विविध सदस्यांच्या प्रतिनिधीच्या बैठकीत ठरविलेल्या तत्वावर आधारीत आहे आणि संयुक्त राष्ट्रांनी ३ मार्च १९९२ रोजी आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या विधानसभेमध्ये झालेल्या ठरावावर आधारीत आहे.

(६) आयोगाने, सार्वजनिक सेवकांकडून होणाऱ्या मानवी हक्कांचे उल्लंघन टाळण्यासाठी फार पूर्वीपासून प्रयत्न केला आहे. तो एक उदात्त दृष्टीकोन असून तो प्रतिबंध, संरक्षण आणि प्रोत्साहन या तीन तत्त्वांचे पालन करतो.

(७) आयोग लोकांना लोकसेवकांकडून किंवा त्याच्या अधिकारांच्या निष्काळजीपणामुळे होणाऱ्या मानवी हक्क उल्लंघनाची परिस्थितीत सोडवणूक करण्याचा प्रयत्न करतो.

(८) आयोग आपल्या अधिकाराचा प्रभावीपणे वापर करून त्याद्वारे उल्लंघनाच्या स्वतःहून अथवा, आयोगाकडे तक्रारदाराने स्वतः किंवा त्याचे प्रतिनिधीमार्फत केलेल्या तक्रारीची चौकशी करणे तसेच एखादया न्यायालयात कथित मानवी हक्क उल्लंघनाची चौकशी सुरू असेल तर त्या चौकशीत न्यायालयाची परवानगी घेऊन पक्ष म्हणून सामिल होऊन तसेच कोणत्याही तुरुंग अथवा कोठडीशी निगडीत संस्था ज्या राज्य सरकारच्या अधिपत्याखाली असतील आणि जेथे बंदी, उपचार, सुधारणा किंवा संरक्षणाचे उद्देशाने ठेवले असतील अशा ठिकाणी भेटी देणे, तसेच तेथील बंदी किंवा आश्रीतांचा राहण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करून, त्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता शिफारशी करणे, आणि मानवी हक्क विषयक साक्षरता अशा प्रकारे कार्य करतो याचा समाजातल्या सर्व थरांत प्रसार करण्याचे आणि मानवी हक्कांचे उल्लंघनाचे बाबत संरक्षण देण्याच्या तरतुदींना माध्यमे, चर्चा सत्रे आणि उपलब्ध माध्यमातून प्रोत्साहान देते.

(९) त्यांचे उल्लंघन रोकण्यासाठी असलेले सुरक्षेचे उपाय राज्यातील लोकांच्या जबाबदाऱ्या आणि अपेक्षा विचारात घेवुन/डोळयासमोर ठेऊन आयोग विविध उपक्रम करुन पावले उचलू शकतो उदारणार्थ.—

- हिंसाचार, बलात्कार, छळ आणि कोठडीतील मृत्यू तपासण्यासाठी वरील पावले उचलू शकतो.
- आयोग त्यांच्यात योग्य त्या सुधारणा करण्याची सुरवात करु शकतो.

(१०) आयोगात तीन सदस्यीय मंडळ असते,—

अध्यक्ष - राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष कोणत्याही राज्याचे निवृत्त मुख्य न्यायाधीश असतात.

❖ एक सदस्य उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून किंवा जिल्हा न्यायालयात न्यायाधीश म्हणून कमीत कमी ७ वर्षाचा अनुभव असलेली व्यक्ती असावी.

❖ एक सदस्य याची नेमणूक मानवी हक्क संबंधित ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असणाऱ्या व्यक्तीमधून करण्यात यावी.

(११) कार्यालयीन कामाकरिता आयोगाची खालील भागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे.—

- ❖ प्रशासकीय विभाग
- ❖ लेखा (अकाउंटस्) विभाग
- ❖ अन्वेषण विभाग
- ❖ विधी विभाग
- ❖ संशोधन विभाग

(शा.म.मु.) वाय २१८७—३ (१,०००—१२-२०१४)

## भाग-२

### तक्रारीचे स्वरूप

२.१ आयोगाच्या कामाचे हे १० वे वर्ष आहे. आयोगाने हाताळलेल्या तक्रारीचे स्वरुप पाहता आयोगाच्या कामकाजाची व्याप्ती आणि मर्यादा यांच्यात खरोखरच वाढ झालेली दिसून येत आहे. मानवी हक्क आयोगाच्या कार्याबाबत जनजागृती निर्माण झालेली दिसून येते. त्यामुळे आयोगाकडे तक्रारी घेऊन येणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढली आहे.

२.२. चालू अहवाल वर्षात सन २०१०-११ मध्ये आयोगाला एकूण ५६३४ तक्रारी प्राप्त झाल्या. मागील वर्षाच्या प्रलंबित प्रकरणांची संख्या २९०२ होती यापैकी निकाली निघालेल्या प्रकरणांची संख्या ५४९२ होती. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत या वर्षाची प्रकरणे निकालात काढण्याचा दर जलदगतीने आहे हे निदर्शनात आले आहे.

२.३. सन २०१०-११ या वर्षी तपास विभागाकडे ८१ प्रकरणे पाठविण्यात आली होती. त्यापैकी ७८ प्रकरणे पूर्णपणे तपासण्यात आली असून त्याचा सदर अहवाल हा आयोगाकडे सादर करण्यात आला. या वर्षाच्या शेवटी फक्त ३ प्रकरणे तपास करण्यासाठी तपास विभागाकडे प्रलंबित आहेत.

२.४. **तक्रारीचे स्वरुप :—**

आयोगाला मिळालेल्या ५६३४ तक्रारींचा एक विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला होता. आणि त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले आहे :—

**आयोगाने दखल घेतलेली प्रकरणे,—**

**(१) पोलीस दलाविरुध्द (१७०९ प्रकरणे)**

या तक्रारींमध्ये जास्त करुन समाविष्ट असलेल्या तक्रारी, पोलीसांकडून अधिकाराचा गैरवापर, गून्हा नोंद न करणे, खोट्या प्रकरणांमध्ये गुंतवणे, गैरकायदेशीर अटक, भ्रष्टाचार इ.प्रकारच्या तक्रारी.

**(२) सरकारी नोकर / अधिकारी, आणि स्थानिक संस्था यांच्याविरुद्धच्या तक्रारी (३४९ + २४४ प्रकरणे)**

ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा आणि महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, सामाजिक कल्याण विभाग इ. च्या विरुद्धच्या तक्रारींचा या वर्गात समावेश होतो.

**(३) जनहिताशी संबंधित प्रकरणे (३९ प्रकरणे)**

या वर्गात सार्वजनिक आवड व इतर बाबींचा सहभाग असणाऱ्या गोष्टींचा समावेश आहे.

**(४) जातीवाचक अत्याचार संबंधित तक्रारी (५७ प्रकरणे)**


जातीवरुन अत्याचार, मुलांसंबंधित अत्याचार, वैद्यकीय निष्काळजीपणा, या संबंधित तक्रारी या कक्षेत समाविष्ट करण्यात आल्या आहे.

**(५) तुरूंगातील छळांच्या तक्रारी (३२ प्रकरणे)**

पोलीस शिपाई आणि अन्य पोलीस कर्मचारी हे कैद्यांना हाताने मार देऊन त्यांचा मानसिक व शारिरीक छळ करतात या तक्रारींचा यात समावेश आहे. मानवाधिकारांचे असे ठळक उल्लंघन झाल्यावर माननीय सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या डी. के. बसू यांच्या मार्गदर्शक तत्वाचे हनन होते; आणि त्यांना अन्न नाकारणे, त्यांचा अमानुष छळ करणे आणि त्यांच्या वकिलाना व नातेवाईकांना भेटू न देणे.

(६) **विविध तक्रारी (४४ प्रकरणे)**

**दखल घेता येणारी प्रकरणे**




**कायद्यांन्वये आयोगाकडे न चालणाऱ्या तक्रारी**

(१) **खाजगी मालमत्ता विषयक तक्रारी (२७४६ प्रकरणे)**

या प्रकारात या अहवालाच्या कालावधीत सर्वात जास्त तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या प्रकारात खाजगी वादात जे मुद्दे उपस्थित झाले आणि ज्यात सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी प्रतिवादी नव्हते या तक्रारीसुध्दा समाविष्ट केलेल्या आहेत. आणि त्यामुळे आयोग सदरच्या तक्रारींची दखल घेऊ शकला नाही.

(२) **मालमत्ता संबंधित तक्रारी ( १३३ )**


यात विक्रीमधे फसवणूक, गहाण, योजनेचे पुर्नवसन आणि जमिनीचा गैरव्यवहार संपत्तीतील वाद व इतर वाद यांचा या तक्रारीत समावेश होतो.

(३) **बँकेसंबंधित तक्रारी (३३ प्रकरणे)**

(४) **कौटुंबिक तक्रारींचा समावेश (६९ प्रकरणे)**

(५) **सेवा, ग्रॅच्यूटी, पेंशन आणि निवृत्ती संबंधी अडचणी या विषयी तक्रारी (१७९ प्रकरणे)**

**दखल घेता न येणारी प्रकरणे**




२.५. आयोगाने दखल न घेता येणारी प्रकरण.— वरील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आयोगाकडून दखल घेता येणारी बहुतांशी प्रकरणे ही पोलीस विभागा विरूद्ध आहेत. ही बाब मागील काही वर्षाच्या अहवालावरुन दिसून येते. मानवी हक्क उल्लंघन, संबंध पोलीस दलातील संवेदनशीलतेचा अभाव दर्शवतो. परंतु वाढती प्रकरणे ही विसंगती दर्शविते की डी.के.बसू प्रकरणातील मार्गदर्शक तत्वांचे योग्य प्रकारे पालन करण्याची पद्धत अमंलात आणलेली नाही. या बाबीची गंभीर दखल घेण्यात आली आणि पोलीस दलासाठी प्रशिक्षण तसेच जागरूकता कार्यक्रम यांची शिफारस करण्यात आली.

२.६. आयोगाकडे दखल न घेता येणारी बरीच प्रकरणे प्राप्त झाली होती ही बाब असे दर्शविते की, आयोगाचे अधिकार कार्य आणि कार्यक्षेत्र या बाबत जनजागृतीचा अभाव आहे. ही बाब ठळकपणे दिसून येते ही अडचण दूर करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. ज्यामध्ये आयोगाचे सदस्य जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावर प्रकरणात सुनावणी घेतात. भेटी देणे, व्याख्याने देणे इत्यादी आयोगाच्या संबंधात जनजागृती, प्रसार केला आहे.

२.७. आयोगाने स्वयंखुद म्हणजे स्वतःहून घेतलेली दखल.— या प्रकारात अशा तक्रारींचा समावेश होतो ज्यात आयोगाने अन्यायग्रस्त व्यक्तीच्या वतीने स्वतःहून दखल घेतलेली असते. अशा प्रकरणात आयोग स्वतः पक्षकार होतो आणि अशा प्रकारे पुढील कार्यवाही केली जाते. आयोगाला हा अधिकार मानव हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या तरतुदीनुसार मिळालेला आहे.

२.८. **कोठडीतील मृत्यू प्रकरणे :—**

आर्थिक वर्ष २०१०-११ साली २६४ कोठडीतील मृत्यू प्रकरणे आयोगाकडे सादर केली आहेत, त्यातील काही प्रकरणे खालीलप्रमाणे :—

१) श्रध्दानंद महिला आश्रम, मुंबई - बाल सुधार गृह मृत्यू

२) एस. पी. उस्मानाबाद - पोलीस कोठडीत मृत्यू

३) पोलीस उपायुक्त, अंधेरी (पू.), पोलीस कोठडीत मृत्यू

**४) पोलीस उपायुक्त, मुंबई, पोलीस चकमकीत ठार**

**५) अधीक्षक, कल्याण** जिल्हा , तुरूंग - तुरूंगात मृत्यू

६) अधीक्षक, औरंगाबाद तुरूंग-पोलीस कोठडीते मृत्यू

७) अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अहमदनगर पोलीस कोठडीत मृत्यू

८) अधीक्षक, तुरुंग ठाणे -तुरूंगात मृत्यू

९) पोलीस उपायुक्त, झोन - ११, मुंबई पोलीस चकमकीत ठार

१०) वर्धा जेल, जेल मध्ये मृत्यू

११) अधीक्षक, कळंबा जेल, कोल्हापूर, तुरूंगात मृत्यू

१२) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एमआयडीसी पोलीस स्टेशन, सोलापूर, पोलीस कोठडीत मृत्यू

१३) स्नेहालय -स्नेहांकुर दतक कैद, अहमदनगर, बालगृहात मृत्यू

१४) प्रभा हिरा प्रतिष्ठान, पंढरपूर, सोमापूर, बालगृहात मृत्यू/हिवहरे

१५) श्रध्दानंद महिला आश्रम, माटुंगा, मुंबई, बालगृहात मृत्यू

१६) वरिष्ठ पोलीस(ग्रामीण)सोलापूर, पोलीस स्टेशन मध्ये मृत्यू

१७) पोलीस आयुक्त, अमरावती शहर, पोलीस कोठडीत मृत्यू

१८) तहसीलदार, मुरबाड, जिल्हा ठाणे, पोलीस कस्टडीत मृत्यू

१९) पोलीस उपायुक्त, गुन्हे विभाग(सीआयडी) मंबई, पोलीस कस्टडीत मृत्यू

२०) अधीक्षक, मेसर्स जयलक्ष्मी, आशा सदन, मुंबई, बालगृहात मृत्यू

२१) अधीक्षक, सातारा जिल्हा पोलीस स्टेशन, पोलीस कोठडीत मृत्यू

२२) अधीक्षक पोलीस, सांगली पोलीस कोठडीत मृत्यू

२३) पोलीस अधीक्षक, अमरावती, पोलीस कोठडीत मृत्यू

२४) वरिष्ठ पोलीस, नाशिक, पोलीस कोठडीत मृत्यू

२५) पोलीस अधीक्षक, सातारा, पोलीस कोठडीत मृत्यू

२६) पोलीस अधीक्षक, सीआयडी नागपूर, पोलीस कोठडीत मृत्यू

२७) पोलीस अधीक्षक/वरिष्ठ पोलीस(ग्रामीण), पोलीस कोठडीत मृत्यू

## भाग-३

## आयोगाची कार्ये

मानवी हक्क कायदा, १९९३ च्या कलम १२ प्रमाणे आयोग मानवी हक्कासाठी खालील सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्ये पार पाडील :-

१) स्वतःहून अन्यायग्रस्त प्रकरणात चौकशी करणे किंवा अन्यायग्रस्त व्यक्तीच्या अर्जावर चौकशी करणे.

अ) मानवी हक्कांचा भंग किंवा त्यास अपप्रेरणा देणे किवा,

ब) अशा हक्क भंगास प्रतिबंध करण्यास लोकसेवकांकडून झालेला निष्काळजीपणा.

२) मानवी हक्कांचा भंग झाल्याचा कोणताही आरोप असलेल्या व कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या न्यायालयाच्या संमतीने हस्तक्षेप.

३) राज्य शासनास नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरूंगात किंवा अन्य एखद्या संस्थेत उपचाराच्या, सुधारण्याच्या किंवा सुरक्षततेच्या प्रयोजनार्थ व्यक्तीस स्थानबध्द केलेले किंवा ठेवून घेण्यात आलेले असेल त्या तुरुंगाला वा संस्थेला राज्य शासनाला सुचना देवून त्या आवासी व्यक्तीच्या तेथील राहणीमानाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भेट देईल आणि त्यासंबंधी शिफारस करील.

४) संविधानाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यांन्वये मानवी हक्कांचे संरक्षण उपायांचा आढावा घेईल व त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करील

५) मानवी हक्कांच्या उपभोगामध्ये प्रतिबंध करणाऱ्या दहशतवादी कृत्यास असलेल्या घटकांचे, पुर्नविलोकन करुन त्यावर उचित सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करील.

६) मानवी हक्काच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेईल व त्यास चालना देईल.

७) मानवी हक्कांबाबतची जाण समाजाच्या विविध वर्गात निर्माण करण्यासाठी जागृती करणे आणि प्रकाशने, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधणे याद्वारे मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षक उपाययोजनांची माहिती करुन देण्यासाठी चालना देईल.

८) मानवी हक्कांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संघटना आणि संस्था यांना ते करीत असलेल्या प्रयत्नांना उत्तेजन देईल, आणि

९) खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थांना प्रोत्साहान देणे, मानवी हक्कांच्या संरक्षणसाठी आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करील.

**अटक केलेल्या व्यक्तीचे अधिकार :—**

अटक म्हणजे व्यक्तीला प्रतिबंध करुन त्याला कायद्यानुरुप वागण्यास बाध्य करणे. व्यक्तिला अटक करतांना पोलीस अधिकाऱ्यांने नुसता स्पर्श जरी केला तरी पुरेसा असतो, त्या करिता व्यक्तिच्या विरुध्द बळ वापरुन प्रत्यक्ष ताब्यात घेणे आवश्यक नसते. भारतीय राज्यघटनेच्या कलम २२ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली ही संज्ञा समावेशक असून या संज्ञेमध्ये व्यक्तीला कोणत्याही कायदेशिर विभागाकडून किंवा कोणत्याही विवादी किंवा फौजदारी न्यायालयाचे आदेशानुसार अटक होण्याची भिती असलेल्या सर्व प्रकरणांचा समावेश होतो. हे कलम एवढे व्यापक आहे की त्यामध्ये भिक्षेकरी गृह, पुनर्वसन गृह, महिला गृहाचा समावेश होतो. डी.के.बसू विरुध्द पश्चिम बंगाल स्टेट या प्रकरणात ११ मार्गदर्शक तत्वे दिली आहेत; आणि पुढे याचे पालन करण्यास अयशस्वी झालेल्या संबंधित अधिकारीच फक्त जबाबदार नाहीत तर विभागीय क्रिया सुध्दा जबाबदार आहेत. तसेच कोर्टाची बेअदबी करुन देखील शिक्षेस जबाबदार धरुन हे प्रकरण कोणत्याही न्यायालयात सुरु केले जाऊ शकते, न्यायालयाने मान्य केले की, हे मार्गदर्शक तत्वे संविधानाच्या कलम २१ आणि २२(१) पासून उगम पावत असून इतर सरकारी संस्था यांना समानपणे लागू आहेत. खालील आवश्यक गोष्टी दिल्या गेल्या :—

१) जो पोलीस कर्मचारी अटक व अटक व्यक्तीची चौकशी हाताळत असेल त्याने अचूक दिसेल असे स्पष्ट ओळखपत्र ठेवले पाहिजे, त्यामध्ये नाव व पद दाखविले पाहिजे. अशा सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचा तपशील जे अटक व्यक्तीची चौकशी करीत असतात, त्या नोंदवहीमध्ये नोंद झाली पाहिजे.

२) जो पोलीस अधिकारी अटक व्यक्तीची अटक करीत असेल त्याने अटकेच्या वेळी टिपण/मेमो बनविला पाहिजे, जो मेमो कमीत कमी एक तरी साक्षीदाराने साक्षीत केला पाहिजे, जो अटक व्यक्तीच्या कुटुंबाच्यापैकी पाहिजे किंवा जेथून अटक झाली आहे त्या स्थळातील माननीय व्यक्ती असली पाहिजे. ते अटक व्यक्तीने स्वाक्षरी केलेले असले पाहिजे व त्यामधे अटकेचा दिनांक व वेळ असला पाहिजे.

३) अटक व्यक्ती किंवा पकडलेली व्यक्ती पोलीस ताब्यामध्ये चौकशी केंद्र किंवा कैदखान्यामध्ये असेल, त्याच्या मित्राला, नातेवाईकांना किंवा दुसरा माणूस त्यांना ओळखणारा किंवा त्यांचा हितचिंतक असणारा, जेवढे शक्य असेल तेवढ्यांना कळविले पाहिजे की ती व्यक्ती अटकेत आहे किंवा पकडून ठेवलेली आहे, व कोणत्या ठिकाणी आहे, परंतु अटक मेमोचा साक्षीदार स्वतः अटक व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक असेल तर तसे सांगण्याची गरज नाही.

४) अटक व्यक्तीच्या अटकेची वेळ, अटकेची जागा व अटक व्यक्तीला जेथे ताब्यामध्ये ठेवले आहे हे सर्व पोलीसांनी जेथे व्यक्तीचा मित्र व नातेवाईक राहत असेल तेथे कळविले पाहिजे, जो जिल्ह्याच्या किंवा शहराच्या बाहेर असेल तर विधी मदत संस्था व संबंधित पोलीस ठाण्यामार्फत अटकेच्या आठ ते बारा तासामध्ये तारेने कळविले पाहिजे.

५) अटक व्यक्ती अटकेच्या नंतर जेवढे लवकर होईल तेवढे त्यांला त्याच्या हक्कांची जाणीव करुन दिली पाहिजे की त्यांच्या अटकेची किंवा पकडून ठेवले आहे त्याची माहिती कोणाला तरी दिली पाहिजे.

६) जेथे अटक केले आहे तेथे नोंदवहीमध्ये अटकेची नोंद केली पाहिजे, ज्यामध्ये अटकेची माहिती अटक व्यक्तीच्या मित्राला दिलेली आहे त्या मित्राचे नाव व ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यामध्ये अटक व्यक्ती आहे, त्या पोलीस अधिकाऱ्याचा तपशील दिलेला असला पाहिजे.

७) अटक व्यक्ती, जेथे तो विनंती करीत असेल तेथे त्याची अटकेच्या वेळी तपासणी झाली पाहिजे व ज्या काही छोट्या व मोठ्या जखमा त्याच्या/ तिच्या शरीरावर असतील तर त्याची त्यावेळी नोंद झाली पाहिजे. निरीक्षण मेमो अटक व्यक्ती व अटक करणारा पोलीस अधिकारी या दोघांनी स्वाक्षरी केलेला असला पाहिजे व त्याची प्रत अटक व्यक्तीला दिलेली असावी.

८) अटक व्यक्तीच्या वैदयकीय तपासणी त्याच्या अटकेतील प्रत्येक ४८ तासाने शिकलेल्या डॉक्टर, मान्यताप्राप्त सूची, संबंधित निर्देशक, राज्य व केंद्रीय प्रदेश, आरोग्य सेवा यांनी नेमणूक केलेला असावा. निर्देशक आरोग्य सेवा, यांनी तशी सूची सर्व तालुके व जिल्ह्यांकरिता सुध्दा तयार करावी.

९) सर्व कागदपत्रांच्या प्रति त्यामध्ये अटक मेमो, वरती उल्लेख केलेला, न्यायाधिशांनी त्यांच्या नोंदणीसाठी पाठविल्या पाहिजेत.

१०) अटक केलेल्या व्यक्तीला त्याच्या चौकशी वेळी त्याच्या वकीलांना भेटण्याची परवानगी जरी संपूर्ण चौकशीच्यावेळी नसली तरी, परवानगी दिली पाहिजे.

११) सर्व जिल्हे व राज्य मुख्यालयात एक कंट्रोल रुम पुरविला पाहिजे, जेथे अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने अटक व्यक्तीच्या अटके बद्दल व जेथे ताब्यात ठेवलेल्या जागेबद्दल माहिती अटकेच्या बारा तासाच्या आत दिली पाहिजे व पोलीस कंट्रोल रुममध्ये दिसेल अशा सूचना फलकावर प्रदर्शित केल्या पाहिजे.

सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने सी.आर.एम.एम.सी क्र .४२१०/१९९७, ४१०५/१९९९, २६६० आणि २६०१/२०००, ४४०/४००१, आणि १२०४/२००१ जनहित याचिका नं ५१९ च्या १९८६ आणि ५९२/८७, १९ ऑक्टोबर २००१ च्या निकालांमध्ये केंद्र शासनाच्या आणि इतर सर्व राज्यांच्या राज्य सरकारांना निर्देश देवून असा आदेश केलेला आहे की सर्व राज्यांच्या राज्य सरकारांनी त्यांच्या राज्यातील मानवी हक्क आयोगाला एका उप समितीची वरील ११ मार्गदर्शक तत्वांची अमंलबजावणी होते की नाही याची देखरेख करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला अटक करतांना आणि स्थानबध्द करतांना पोलीस, कस्टम वन इ. हे सर्व करण्याचा एकमेव उददेश आहे की ज्यामुळे कोठडीतील हिंसा, यातना, छळ यावर नियंत्रण ठेवणे आणि अधिकाऱ्यांवर जबाबदारी देता येईल.

जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क घटनेतील कलम २१ प्रमाणे स्थापित केला आहे. त्यामध्ये मानवी प्रतिष्ठेच्या जीवन जगण्याचा अधिकार आहे आणि राज्य शासन व त्यांचे अंमलदारापासून छळ व हल्ला यांच्याविरुध्द हमी दिलेली आहे. घटनेतील कलम २२ मध्ये काही परिस्थितीमध्ये अटकेपासून व कैदेत ठेवण्यापासून संरक्षणची तरतूद आहे. या संविधानिक संरक्षणाबरोबरच काही वैधानिक तरतुदी वैयक्तिक स्वातंत्र्य प्रतिष्ठा व नागरिकांच्या मुलभूत मानवी हक्कांचे संरक्षण करतात.

३.२) माननीय सर्वोच्च न्यायालयाने डि. के. बसू विरुध्द बंगाल राज्य, ए.आय.आर. १९९७ सर्वोच्च न्यायालय,६१० मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण केले आहे.

"संविधानाच्या कलम २१ प्रमाणे हमी दिलेली मौल्यवानपूर्ण हक्क, खटला चालत असलेला गुन्हेगार,अटकेमध्ये असलेला व तुरुंगातील इतर बंदी यांना नाकारता येत नाही. फक्त कायद्याने काही वाजवी बंधने घालून दिली आहेत ती सोडून कुठल्याही प्रकारचा छळ किंवा अमानवी व अपमानस्पद वागणूक घटनेतील कलम २१ च्या कक्षेत येत नाही. मग ते चौकशीच्या वेळी विचारपूस करतेवळी किंवा दुसऱ्या प्रकारे असो कारवाईतील पारदर्शकता व जबाबदारी हे दोन शक्य असलेले संरक्षणात्मक उपाय आहेत त्यांच्यावर न्यायालयाने भर दिला आहे."

३.३) सर्वोच्च न्यायालयाने ही ध्येये साध्य करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिलेली आहेत सर्वोच्च न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला अटक करताना वरील उद्देशसाध्य करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे सांगितलेली आहेत. व्यक्तीला अटक करताना त्यांचे पालन होऊ शकेल.

सर्वोच्य न्यायालयाने, डी. के. बासू प्रकरणामध्ये इतर वैधानिक सुरक्षिततेसह जी अकरा मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत त्यांचे योग्य पालन होण्यासाठी व प्रकरणांचे पुढे योग्य निरीक्षण केले जाईल याची निश्चिती करण्यासाठी व त्यांचे तंतोतंत पालन होण्यासाठी आदेश दिला की, हे काम मानवी हक्क आयोग, जे बऱ्याच राज्यात स्थापन केलेले आहेत, त्यांना देण्यात यावे.

त्या प्रकरणात असेही आदेश देण्यात आले की, मानवी हक्क आयोगामध्ये उप समित्यांची स्थापना व्हावी, ज्यामुळे हे निरीक्षण केले जाईल की, या ११ मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता केली जात आहे की नाही व पुढची आवश्यक कार्यवाही केली जाईल ज्यामुळे याची खात्री केली जाईल. की ११ मार्गदर्शक तत्त्वांची पुर्तता केली जात आहे.

(३.४) माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने उप समितीची स्थापना केली आहे. ज्यामुळे माननीय उच्चतम न्यायालयाचे ११ निर्देशांचे पालन होण्यासाठी लक्ष ठेवले.

**उप समितीची रचना :—**

सदर उप समितीचे सदस्य खालीलप्रमाणे आहेत :—

न्यायमूर्ती व्हि. जी. मुन्शी अध्यक्ष

श्री. टी. सिंगारावेल - सदस्य

श्री. सुभाष लाला - सदस्य

(३.५) **पोलीस स्टेशनमध्ये अकस्मित भेटी देणे, निरिक्षण अहवाल व शिफारशी सादर करणे :—**

आयोगाकडून मिळालेल्या सर्वात अधिक तक्रारी या पोलिसांच्या अत्याचाराबाबत आहेत. माननीय सदस्य आणि इतर कर्मचारी यांनी पोलीस स्टेशन्सना आकस्मिक भेटी देऊन पोलीस कर्मचारी वर्गाकडून डी. के. बसू निर्देशांचे यथायोग्य रितीने पालन केले जाते की नाही याची खातरजमा करण्यासाठी धडक मोहीम हाती घेतली. भेटीच्या दरम्यान, अटक व्यक्तीची माहिती त्याच्या नातेवाईकांना दिल्याबद्दल इत्यादी गोष्टी तपासल्या गेल्या. अटक मेमो जसे माननीय सुप्रीम कोर्टाच्या दृष्टीत आहे त्याप्रमाणे तपासला गेला, त्यावर अटक व्यक्तीची स्वाक्षरी केलेली आहे व साक्षीदाराने साक्षीत केलेला असून अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वाक्षरी केलेली आहे.

**आयोगाच्या भेटी**

| अ.क्र. (१) | पोलीस स्टेशन/ संस्था (२) | जिल्हा (३) | भेटीचा दिनांक (४) | मान. अध्यक्ष/ सदस्य/ सचिव (५) |
|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा तुरुंग | अहमदनगर | ०२/०७/२०१० | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| २. | कोथरूड पोलीस स्टे. | पुणे | ११/११/२०१० | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| ३. | जिल्हा तुरुंग | बुलढाणा | १४/१२/२०१० | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| ४. | मध्यवर्ती मिल | अकोला | १५/१२/२०१० | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| ५. | सेंट क्रिसपिंग घर | पुणे | ३०/१२/२०१० | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| ६. | जिल्हा तुरुंग | सांगली | १७/०२/२०११ | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| ७. | रिमांड होम (सुधारगृह) | सांगली | १८/०२/२०११ | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| ८. | मुलींचे सुधार गृह | सांगली | १८/०२/२०११ | न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी |
| ९. | कस्टोडियल संस्था | चिपळून | ०९/१०/२०१० | श्री. टि. सिंगारावेल |
| १०. | रत्नागिरी विशेष तुरुंग | रत्नागिरी | १०/१०/२०१० | श्री. टि. सिंगारावेल |
| ११. | कस्टोडियल संस्था | रत्नागिरी | ११/१०/२०१० | श्री. टि. सिंगारावेल |
| १२. | कस्टोडियल संस्था | नागपूर | ०३/१२/२०१० | श्री. टि. सिंगारावेल |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १३. | कस्टोडियल संस्था | अहमदनगर | २५/१२/२०१० | श्री. टि. सिंगारावेल |
| १४. | पैठण खुला तुरुंग | पैठण | २६/१२/२०१० | श्री. टि. सिंगारावेल |
| १५. | कोल्हापूर तुरुंग | कोल्हापूर | १०/०१/२०११ | श्री. टि. सिंगारावेल |
| १६. | कस्टोडियल संस्था | पुणे | ११/०१/२०११ | श्री. टि. सिंगारावेल |
| १७. | नाशिक रोड सेंट्रल | नाशिक | २१/०१/२०११ | श्री. टि. सिंगारावेल |
| १८. | तुरुंग सेंट्रल जेल | ठाणे | २९/०१/२०११ | श्री. टि. सिंगारावेल |
| १९. | शासकीय जुवेनित्ते मोठ्या मुलांसाठी सुधार गृह | नागपूर | २८/०१/२०११ | श्री. माफिउल हुसेन |
| २०. | शासकीय सुधार गृह छोट्या मुलांसाठी | नागपूर | २८/०१/२०११ | श्री. माफिउल हुसेन |
| २१. | शासकीय महिला संरक्षण गृह | नागपूर | २८/०१/२०११ | श्री. माफिउल हुसेन |

आयोगाचे मा. अध्यक्ष श्री. न्यायमूर्ती क्षितीज आर. व्यास हयांनी रत्नागिरीच्या तुरुंगाला भेट दिली. आयोगाला एक पत्र त्या जेलमधील मिळाले. कैदी श्री. देवा प्रभाकर काळभोर ज्यात त्यांनी तक्रार केली होती की जेलमधील त्याचा प्रतिस्पर्धा ग्रुप त्याला जीवे मारण्याची धमकी देत आहेत. भेटीनंतर आयोगाच्या मा. अध्यक्षांनी चौकशी केली आणि शिफारशीचे पत्र एसी एस गृह खाते मंत्रालय ह्यांनी लिहून ताबडतोब या कैद्याची रवानगी येरवडा जेलमध्ये करण्याची शिफारस केली. आयोगाला पत्र दिनांक ३० डिसेंबर २०१० रोजी कारागृह महानिरीक्षक पुणे यांचेकडून मिळाले त्यात त्यांनी कैदी श्री. काळभोर याला येरवडा जेलमध्ये पुणे येथे कायमस्वरूपी हस्तांतरित केलेले आहे आणि शिफारशीची अमंलबजावणी केलेली आहे असे लिहून कळविले.

## भाग ४

## मानवी हक्क शिक्षण आणि जागरुकता प्रोत्साहन

मानवी हक्काचे शिक्षण आणि जागरुकता यासाठी आयोगाने राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आणि इतर सामाजिक संस्था यांच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. या संदर्भात आयोगाने राष्ट्रीय मानवधिकार आयोगाच्या सहकार्याने मानवधिकार शिक्षण ही राष्ट्रीय पातळीवरील परिषद १२ ऑगस्ट २०१० रोजी सहयाद्री अतिथिगृह येथे आयोजित केली होती. या परिषदेला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि उच्च पातळीवरील अधिकारी उपस्थित होते. मान्यवरांमध्ये महाराष्ट्राचे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्य मंत्री, मा. उच्च शिक्षण मंत्री, मा. अध्यक्ष आणि राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे एक सदस्य उपस्थित होते. अधिकाऱ्यांच्या मध्ये महाराष्ट्र महाविद्यालयाचे कुलपती, उपाध्यक्ष, राज्य आणि जिल्हा बोर्डचे अधिकारी, मुख्याध्यापक / महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शिक्षण संबंधित इतर मान्यवर उपस्थित होते.

**परिषदेत सादरीकरण :—**

महाराष्ट्रातील मानवाधिकार शिक्षणाचा योग्य दृष्टीकोन बाहेर आणण्यासाठी सात सादरीकरणे सादर करण्यात आली. या सादरीकरणामध्ये कल्पना आणि विभिन्न तत्त्वज्ञान यांची समग्र चित्रे सादर करण्यात आली, मानवी हक्क शिक्षण तीन पातळ्यांवर म्हणजे प्राथमिक पातळीवर, माध्यमिक स्तर आणि उच्च पातळीवर शिकवले जाते.

(१) पुणे विद्यापिठाचे उप कुलगुरु प्रो. आर. के. शेगावकर यांनी पुणे विद्यापिठातर्फे सादरीकरण केले.

(२) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ श्री. विनित जोशी अध्यक्ष सी.बी.एस.ई यांनी सादरीकरण केले. (श्री. प्रमोद कुमारसी बी.एस.ई. ऑफिसर यांनी सादरीकरण तयार केले.)

(३) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्यातर्फे मिसेस व्ही. एस. सरदेसाई - अध्यक्ष राज्य मंडळ यांनी सादरी करण केले.

(४) राष्ट्रीय परिषद - शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण नवी दिल्ली यांच्या वतीने प्रोफे. जी. रवींद्र, संचालक एससीईआरटी यांनी सादरीकरण केले.

(५) प्राथमिक शिक्षण एससीईआरटी यांच्या वतीने श्री.बी. आय नगराले आय.ए.एस. (निवृत्त) यांनी सादरीकरण केले.

(६) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या वतीने प्रोफेसर कृष्णनकुमार, उप कुलसचिव यांनी सादरीकरण केले. (वायसीएमओयू) (प्रो. नागार्जुन) वाडेकर यांनी सादरीकरण तयार केले.

(७) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सादरीकरण करण्यात आलेले प्रसारीत करण्यात आले.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी तीन गटामध्ये त्याची विभागणी केली. जसे प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, प्रतिनिधींनी एचआरई गटाचे सादरीकरण करुन प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण पातळी त्यात समाविष्ट केली.

सादरीकरणामध्ये मानवाधिकार संबंधित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाचा आवश्यक तो बदल करण्यात यावा, अशी शिफारस करण्यात आली. आयोगाने परिषदेने तयार केलेल्या शिफारसी काळजीपूर्वक वाचून मान्य केल्या. आणि पुढील कारवाईसाठी आयोगाच्या शिफारशी विविध प्राधिकरणांना केल्या गेल्या.

सादरीकरण आणि शिफारशी यांना परिषदेमध्ये मान्यता दिल्यावर महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने तेव्हापासून पुस्तकामध्ये पालन केले होते. शिफारसी करण्याच्या उद्देशाने परिषदेत पुणे विद्यापिठाने उच्च शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमात बदल केले आणि आयोगाला दिनांक ०७/०३/२०१४ च्या पत्राद्वारे कळविले त्याचप्रमाणे एम एस सी ई आर टी ने इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत अभ्यास क्रमामध्ये बदल केले आणि ते आयोगाला दिनांक १२/०३/२०१४ च्या पत्रामध्ये कळविले आहे.

## भाग - ५

## प्रशासकीय काम आणि तर्कसंगतीचे समर्थन

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय मानवी हक्क आयोग क्रमांक १०९९/३७८/पोळ-१४ दिनांक जानेवारी २००० रोजी राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापन झाली आणि तो ६ मार्च २००१ रोजी कार्यरत झाला. या ठरावामध्ये एक अध्यक्ष आणि तीन आयोगाचे सदस्य असतील आणि याचे मुख्य कार्यालय मुंबई हे असेल. न्यायमूर्ती क्षितीज आर. व्यास हे या वर्षाही अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी, श्री. टी. सिंगारवेल हे सदस्य म्हणून सतत कार्यरत आहेत. मा. सदस्य श्री. सुभाष लाला ३ जानेवरी २०११ रोजी राजीनामा दिला.

**कर्मचारी :—**

५.१. आयोगाचा कर्मचारी वर्ग ह्या दरम्यान विविध भागांमध्ये जसे प्रशासकीय विभाग, लेखा विभागा, तपास विभाग, कायदेशीर विभागामध्ये काम करीत आहे.

५.२. चालू अहवाल वर्षी श्री. माफिउल हुसेन हे आयोगाचे सचिव म्हणून काम पहात आहेत. श्री. के. एल. बिशनोई आयपीएस हे पोलीस महानिरीक्षक, अन्वेषण विभाग येथे पूर्वी पासून याही वर्षी कार्यरत आहे. आहेत. श्रीमती नीना खापर्डे, प्रबंधक यांनी आपल्या पदाचा दिनांक ५ जानेवारी २०११ रोजी राजीनामा दिला. आणि तेव्हापासून हे पद रिक्त आहे.

**परिसर / आवार :—**

५.३. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक एचआरसी. १०९९/३७८/पोल - १४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारे नमूद केले की, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यकार्यालय मुंबई येथे असेल. त्याप्रमाणे शासनाने कित्येक जागा देऊ केल्या ज्यामध्ये न्यू ॲडमिनीस्ट्रेटीव बिल्डींग मंत्रालयासमोर, वरळी गव्हर्नमेंट सर्व्हिस, अरुण चेंबर्स ताडदेव, मुंबई, न्यू ॲडमिनिस्ट्रेटीव बिल्डींग, बांद्रा (पूर्व), व ओल्ड कस्टम हाऊस मुंबई येथे दिल्या किंवा दिऊ केल्या शेवटी परिपत्रक क्रमांक जी-ए/११.०१/ सी एन १५ डिसेंबर २०११ दिनांक २० जून २००२ रोजी सरकारने २३८० चौ.फुट जागा - प्रशासकीय स्टाफ कॉलेज इमारत परिसर - ९ हजारीमल सोमानी मार्ग सी.एस.टी. समोर मुंबई ४०० ००१ येथे आयोगाला दिली, ती पूर्वी वित्त आयोगाने व्यापली होती. सध्या आयोग त्याच जागेमध्ये कार्य करीत आहे.

**संसाधने :—**

५.४. दरम्यान सन २०१०-२०११ राज्य शासनाने दिलेले उपलब्ध अनुदान २ करोड ३८ लाख ७२ हजार अनुदान उपलब्ध करून दिले परंतु त्याच्यापैकी एकूण खर्च रु. २ करोड ३८ लाख ६४ हजार ३० रुपये खर्च करण्यात आला.